# <u>प्रेसनोट</u>

जा.क्र.-पोउप-आ/वाहतूक/ 8371 /२०१७                                    पुणे शहर, दिनांक ११.१०.२०१७.

**<u>विषय</u> :- ट्रकला लावण्यात आलेला जॅमर चोरी प्रकरणी आरोपीस शिक्षा झाले बाबत.**

---------------oo---------------

दिनांक- २२/०६/२०१६ रोजी,दत्तवाडी वाहतुक विभागाचे प्रभारी अधिकारी पोलीस निरीक्षक श्री मुरलीधर करपे, हे व त्यांचा स्टाफ,पो.शि. ८१४१ कानवडे,पो.ना.६६८० असे वाहतुक विभागात वाहतुकीचे नियमन करत असताना ट्रक क्रमांक- MH12EF1998 हा ट्रक पुणे-मुंबई हायवे वरील न-हेगावाकडे जाणा-या सर्व्हिस रोडवरती ज्ञानेश्वरी निवास बिल्डींग समोरील काळूबाई मंदिरासमोर वाहतुकीस अडथळा होईल अशा पध्दतीने लावलेला होता. ट्रकच्या वाहनचालकाने केलेल्या वाहतुकीचे नियमभंगाबद्दल सदर ट्रकला शासकिय जॅमर लावले होते. दिनांक- २३/०६/२०१६ रोजी सदरचा ट्रक लावलेला शासकिय जॅमर हा तोडून ट्रक वाहनचालक नामे- संतोष लक्ष्मण तेलंगे, वय-२६ वर्ष, रा. मु.पो.केळेवडे ता.भोर,जि.पुणे याने ट्रक घेऊन गेल्याने सदर बाबत सिंहगडरोड पोलीस ठाणे येथे गु.रजि.क्र. २४३/२०१६ भा.द.वि.कलम- ३७९,४२७ प्रमाणे फिर्याद देण्यात आली होती, त्यावरुन सदर खटल्याची सुनावणी श्री. व्ही.बी. गुळवेपाटील,प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,शिवाजीनगर न्यायालय पुणे यांचे कोर्टात चालू झाली व त्यामध्ये मा. कोर्टांनी दिनांक ०६/१०/२०१७ रोजी आरोपी नामे- संतोष लक्ष्मण तेलंगे, वय-२६ वर्ष, रा. मु.पो.केळेवडे ता.भोर,जि.पुणे यास सीआरपीसी २४८(२) अन्वये कलम- ३७९,४२७ मध्ये दोषी ठरवून त्यास कोर्ट उठेपर्यंत शिक्षा व ५०००/- रुपये दंड व दंड न भरल्यास ७ दिवसाची साधी कैद अशी शिक्षा सुनावली आहे.

तरी वाहतुक शाखा पुणे शहर कडून नागरिकांना अवाहन करण्यात येते की,आपले वाहन हे मनाई असलेल्या ठिकाणी तसेच सार्वजनिक वाहतुक अडथळा होईल अशा रितीने पार्क करु नये तसेच वाहतुक शाखेकडून वाहनास लावलेले जॅमर हे शासकिय मालमत्ता असून ते परस्पर तोडून घेऊन जावू नये तसे केल्यास वरीलप्रमाणे शिक्षा होऊ शकते.